**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः19.03.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

- नऊ महिन्यांच्या दीर्घ प्रतिक्षेनंतर, भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स पृथ्वीवर दाखल; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं सुनीता विल्यम्स यांना भारत भेटीचं आमंत्रण
- नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा
- विधानपरिषदेच्या पाच जागांसाठीची पोटनिवडणूक बिनविरोध होणार
  आणि
- कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाचीही विजयी सुरुवात

**सुनीता विल्यम्स**

गेले नऊ महिने अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर आज पहाटे यशस्वीरीत्या पृथ्वीवर परतले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील नासाचे निक हेग आणि रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह हेही पृथ्वीवर परतले आहेत. या अंतराळ वीरांना घेऊन येणारं स्पेसएक्सचं कॅपसूल फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर यशस्वीपणे उतरलं असल्याची माहिती अमेरिकन अंतराळ संस्था, नासानं दिली आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी गेलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर या दोन्ही अंतराळवीरांनी अंतराळ स्थानकात 286 दिवस घालवले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विल्यम्स यांना एक पत्र लिहिलं असून पृथ्वीवर सुरक्षित परतल्यावर भारताला भेट देण्याचं आमंत्रण पंतप्रधानांनी सुनीता विल्यम्स यांना दिलं आहे.

**मोदी लोकसभा**

देशाच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या घटनांप्रमाणे महाकुंभाची नोंद होईल, प्रयागराजमध्ये झालेल्या महाकुंभामुळे संपूर्ण जगाला भारताच्या विराट सामर्थ्याचं दर्शन झालं, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी य़ांनी काल लोकसभेत केलं. कोट्यवधी भाविक या महामेळाव्यात सहभागी झाले होते. अशा उत्सवांमुळे आपल्या परंपरा, आणि वारशाचं जतन आणि संवर्धन करण्याची भावना प्रबळ होते, असं त्यांनी सांगितलं. पंतप्रधानांच्या टिप्पणीच्या निषेधार्थ विरोधी पक्षसदस्यांनी गदारोळ केल्यामुळे कामकाज प्रथम एक

वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. नंतरही गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**सोनिया राज्यसभा**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अर्थात मनरेगा अंतर्गत मजुरांना कायद्यानुसार किमान वेतनाची रक्कम आणि त्यांच्या कामाच्या दिवसांची संख्या वाढवण्याची मागणी खासदार सोनिया गांधी यांनी काल राज्यसभेत शून्य प्रहरात केली. केंद्र सरकार मनरेगा पद्धतशीरपणे कमकुवत करत असल्याचा आरोपही गांधी यांनी यावेळी केला.

**विधि मंडळ**

नागपुरात गेल्या सोमवारी,17 तारखेला झालेला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिला. नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी काल सभागृहात निवेदन दिलं. सर्व समुदायांचे सण-उत्सव सध्या सुरू आहेत आणि अशा वेळी सर्वांनीच एकमेकांप्रति आदरभाव राखावा, शांतता राखत सण साजरे करावेत, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं. या प्रकरणी एकंदर पाच गुन्हे दाखल झाले असून नागपुरातल्या 11 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. कोणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. याबाबत निवेदन करताना मुख्यमंत्री म्हणाले,

**ही घटना घडल्यानंतर जवळपास एक ट्रॉली भरून त्याठिकाणी दगड मिळाले आहेत. शस्त्र देखील त्याठिकाणी मोठ्याप्रमाणात होते. ते जप्त करण्यात आलेले आहेत, वाहनांची जाळपोळ त्या ठिकाणी झालेली आहे, आणि ठरवून काही ठराविक घरांना काही ठराविक आस्थापनांना त्या ठिकाणी लक्ष्य करण्यात आलेले आहे . तीन DCP लेव्हल ची लोक त्या ठिकाणी जखमी झालेली आहेत. आणि जसं मी सांगितलं यातल्या एका DCP वर तर थेट कुऱ्हाडीने वार हा त्या ठिकाणी करण्यात आलेला आहे . त्यामुळे या मध्ये काही लोकांचा निश्चित पणे एक सुनियोजित पॅटर्न हा देखील त्या मध्ये दिसतो आहे , अशा लोकांना त्या ठिकाणी त्यांच्यावर कारवाई ही केलीच जाईल , कुठल्याही परीस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था हाती घेण्याची परवानगी कोणाला ही दिली जाणार नाही. आणि मी स्पष्टपणे सांगतो , पोलिसांवर ज्यांनी हल्ला केला असेल तर त्यांना काय झालं तरी सोडलं जाणार नाही.**

**विधानसभा शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नागपूरच्या घटनेबाबत विधान परिषदेत निवेदन दिलं. गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाचं उदात्तीकरण राज्यात सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. नागपूरमध्ये पूर्वनियोजित कट करून विशिष्ट समुदायांना लक्ष्य केलं गेलं, असा दावाही शिंदे यांनी केला.

**दानवे**

राज्याच्या गृहखात्याचा कारभार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे, त्यांना आपल्या मूळ गावात उसळलेल्या हिंसाचाराविषयी काहीच माहीत नाही, अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल केली.

**बावनकुळे**

नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी 50 जणांना अटक केली आहे. या प्रकरणी अफवा पसरवणाऱ्याचा शोध सुरू असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असं नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. या हिंसाचारात 5 जण जखमी झाले असून त्यातल्या दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. हिंसाचार रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरही दगडफेक झाली असून तीन पोलीस उपायुक्तांसह 33 ते 34 पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर काल शहरातल्या अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त रविंदर सिंघल यांनी दिली.

**विधि मंडळ कामकाज**

राज्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींचा शोध घेण्यासाठी राज्य सरकारनं स्वतःहून एक मोहीम राबवली असून येत्या तीन महिन्यात अशा बांगलादेशींना स्थानबद्ध करण्यासाठी एक केंद्र निर्माण केलं जाईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी काल विधानसभेत दिली. या संदर्भातल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. राज्यातील छोट्या गुंतवणूकदारांचे पाच लाखांपर्यंतचे पैसे सुरक्षित रहावेत यासाठी फसवणूक करणाऱ्या मल्टिस्टेट पतसंस्थांना देखील सहकारी बँकांप्रमाणे संरक्षण द्यावं, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल प्रश्नोत्तराच्या तासांत दिली. नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, विधी आणि न्याय, सामाजिक न्याय, इतर मागास आणि बहुजन कल्याण, या विभागांच्या अर्थसंकल्पातल्या अनुदान मागण्या विधानसभेत काल मंजूर करण्यात आल्या. राज्यात समन्यायी पाणी वाटपाबाबत स्वतंत्र बैठक घेऊन निर्णय घेऊ, असं आश्वासन मंत्री विखे पाटील यांनी काल विधान परिषदेत दिलं.

**अविश्वास प्रस्ताव**

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांच्या विरोधातला विरोधी पक्षांनी मांडलेला अविश्वासाचा प्रस्ताव सभापती राम शिंदे यांनी काल फेटाळला. अविश्वास प्रस्ताव सादर करताना विरोधकांनी कोणतंही ठोस कारण दिलेलं नाही तसंच आवश्यक निकष पूर्ण केले नसल्यानं हा प्रस्ताव फेटाळल्याचं सभापतींनी सांगितलं.

**विधानपरिषद निवडणूक**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पाच जागांसाठीच्या पोटनिवडणुकीत एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरला आहे. त्यामुळे भाजपाचे संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी या पाच उमेदवारांची निवड बिनविरोध होणार हे निश्चित आहे. आता याबाबत अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.

**सरनाईक**

राज्यातील बसस्थानकं अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करण्यासाठी ‘बांधा, वापरा हस्तांतरित करा’, या तत्वावर विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे, असं परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. मुंबईत परिवहन विभागाच्या काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**अनुदान**

2024-25 या आर्थिक वर्षातील पंधराव्या वित्त आयोग अनुदानाची रक्कम केंद्र सरकारनं राज्यातील ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित केली आहे. यामध्ये 611 कोटी रुपयांचा एकत्रित अनुदानाचा दुसरा हप्ता आणि पहिल्या हप्त्यातील एकत्रित अनुदानाच्या 8 कोटी 42 लाख रुपयांचा समावेश आहे. राज्यातल्या पात्र ठरलेल्या 4 जिल्हा परिषदा, 40 पंचायत समित्या आणि 21 हजार 551 ग्रामपंचायतींना हा निधी दिला जाणार आहे.

**रंगपंचमी**

राज्याच्या अनेक भागात होळीनंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे धुळवडीलाच रंगोत्सव साजरा केला जात असला तरी नाशिकमध्ये मात्र रंगपंचमीला रंगोत्सव साजरा केला जातो. आज साजऱ्या होत असलेल्या रंगपंचमीसाठी नाशिककर सज्ज झाले आहे. नाशिक शहरात सात ठिकाणी पेशवेकालीन रहाडी असून जमिनीखाली असलेल्या या रहाडी म्हणजेच हौद यापूर्वीच खुले करण्यात आले आहेत. त्यांची स्वच्छता करून सजावट करण्यात आली आहे. प्रथेप्रमाणे दुपारी महिला आणि मानकऱ्यांच्या हस्ते रहाडीचे पूजन करण्यात येईल आणि त्यानंतर नैसर्गिक रंग खेळला जाईल. नाशिकमधील काही मंदिरांमध्येही आज रंगोत्सव साजरा होणार आहे.

**कबड्डी**

इंग्लंडमध्ये सुरु असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत पुरुष संघापाठोपाठ भारतीय महिला संघानंही विजयी सलामी दिली आहे. ड गटात वॉल्व्हरपॅम्प्टन इथं काल संध्याकाळी झालेल्या सामन्यात भारतीय महिला संघानं वेल्स संघावर 89-18 असा दणदणीत विजय नोंदवला. तर भारतीय पुरुष संघाचा स्कॉटलँडबरोबरचा सामना 64-64 असा बरोबरीत सुटला.

**हवामान**

कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी तापमानात किंचित वाढ झाली असून उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण आणि विदर्भात हवामान कोरडं राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.